नागपूर जिल्हयात बोगस डॉक्टरांसंबधी शोध व
कार्यवाहीच्या मार्गदर्शक सुचना (SOP)

---

जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
जिल्हादंडाधिकारी/बोगस डॉक्टर/कार्यवाही/मार्गदर्शक सुचना/ 76 /२०२५
नागपूर ४४०००१, दिनांक 05/05 /२०२५

परिपत्रक

**जिल्हास्तरीय समिती**

| अ.क्रं. | जिल्हास्तरीय समिती सदस्यांचे पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | जिल्हा दंडाधिकारी | अध्यक्ष |
| २ | पोलिस आयुक्त, नागपूर शहर | निमंत्रित सदस्य |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,नागपूर | निमंत्रित सदस्य |
| ४ | जिल्हा पोलिस अधिक्षक | सदस्य |
| ५ | अधिष्ठाता शासकिय वैद्यकिय महाविद्यालय | सदस्य |
| ६ | अधिष्ठाता इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय | सदस्य |
| ७ | अधिष्ठाता शासकिय आयुर्वेद महाविद्यालय | सदस्य |
| ८ | जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |
| ९ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| १० | जिल्हा माहीती अधिकारी | सदस्य |
| ११ | सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग | सदस्य |
| १२ | नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीक | सदस्य |
| १३ | कंझ्युमर फोरम | सदस्य |
| १४ | हयुमन राईटस ऑक्टिव्हिस्टस/एन.जी.ओ. | सदस्य |
| १५ | उप जिल्हा पोलीस अधिक्षक (मुख्यालय) | सदस्य / सचिव |

**तालुकास्तरावर स्थापन समितीच्या अधिकारात वाढ करण्याच्या उददेशाने**

मा.जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने जिल्हास्तरीय समितीचे अधिकार तालुकास्तरावर प्रदान करण्यासाठी खालील प्रमाणे तालुकास्तरीय बोगस डॉक्टर पुर्नविलोकन समितीला देण्यात येत आहे. तहसिलदार यांचे अध्यक्षतेत तालुकास्तरिय समितीची स्थापना करण्यात येत आहे.

## तालुकास्तरीय समिती

| अ.क्रं. | तालुकास्तरीय समिती सदस्यांचे पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | तहसिलदार | अध्यक्ष |
| २ | गट विकास अधिकारी | सदस्य |
| ३ | मुख्याधिकारी नगर परीषद / पालिका | सदस्य |
| ४ | वैद्यकिय अधिक्षक उजि/ग्रामिण रुग्णालय | सदस्य |
| ५ | तालुका आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ६ | तालुक्यातील वरीष्ठ २ वैद्यकिय अधिकारी<br>(सर्व प्रभारी वै.अ. प्रा.आ.केंद्र व १ उजि/ग्रामिण रुग्णालयातील) | सदस्य |
| ७ | तालुकस्तरीय, अन्न व औषध प्रशासन विभाग | सदस्य |
| ८ | उपविभागीय पोलीस अधिकारी | सदस्य / सचिव |

**<u>सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना</u>**

१) सर्व वैद्यकीय व्यवसायिकांना दवाखान्याच्या दर्शनी भागात आपले वैद्यकीय पदवी व काउन्सील चे क्युआर कोड असलेले नांदणी प्रमाणपत्र प्रदर्शित करणे अनिवार्य राहिल.

२) नागरीकांनी बोगस डॉक्टरांची तक्रार करण्यासाठी राज्यस्तरीय तक्रार व निवारण कक्षाला (१०४ क्रमांकावर) किंवा जिल्हाधिकारी कार्यालय चॅटबॉट क्रं **8669494944** (संवादसेतू) वर संपर्क करावा.

३) गावातील पोलीस पाटील / तलाठी / ग्रामसेवक यांनी गावात नवीन वैद्यकीय व्यवसायीकाने व्यवसाय सुरु केल्यास त्याची माहिती प्रा.आ.केंद्राला देतील तसेच एफआयआर दाखल झालेल्या अवैध वैद्यकिय व्यवसायीकास पुन्हा व्यवसाय करण्यास प्रतीबंध करतील.

४) गावात नविन वैद्यकीय व्यवसाय सुरु झाल्यास त्यांची कागदपत्रांची तपासणी आरोग्य विभागाने करावी.

५) अधिकृत पदवी तसेच नोंदणी प्रमाणपत्र नसणाऱ्या वैद्यकीय व्यवसायिकांची माहिती तालुकास्तरीय समितीला तात्काळ कळविण्यात यावी.

६) शासन निर्णयात दिलेल्या व्याख्ये नुसार शासनमान्य वैद्यकशास्त्रातील पदवी/पदविका असलेले अर्हताधारक व महाराष्ट्र राज्यातील संबंधित वैद्यक परिषदेचे नोंदणीकरण नसलेल्या वैद्यकिय व्यावसायिकांस बोगस अनधिकृत डॉक्टर समजण्यात यावे. वरिल संदर्भ ७ अन्वये केंद्र शासनाचे दि.२५.११.२००३ नुसार ऑलोपँथी, आयुर्वेद व सिध्द युनानी व होमिओपॅथी तसेच नॅचरोपॅथी व योग या चिकित्सा पध्दतीखेरीज अन्य कोणत्याही चिकित्सा पध्दतीस जसे की इलेक्ट्रोपॅथी/ इलेक्ट्रो-होमिओपॅथी, ॲक्यूपंक्चर, मॅग्नेटोथेरेपी इनेक्टोहोमिओपॅथी, मॅग्नेटोथेरीपी रेकी , रिफलेक्सोलॉजी युरिनथेरपी,ऑटोयुरिन थेरपी हिप्नोथेरपी, ॲरोमाथेरपी कलरथेरपी, पॅनिक हिलिंग, जेम्स

अँड स्टोनथेरपी, म्यूजिक थेरपी इत्यादी अल्टरनेटीव्ह सिस्टिम ऑफ मेडीसिन या संज्ञेखाली येणाऱ्या विविध पॅथींना मान्यता दिलेली नाही.

तसेच महाराष्ट्र राज्यात वैद्यकिय व्यवसाय करण्यासाठी महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधियम नियम १९६१ च्या कलम ३३ (एक) नुसार महाराष्ट्र वैद्यक परिषद (ॲलोपॅथी) महाराष्ट्र समचिकित्सा परिषद (होमिओपॅथी) महाराष्ट्र चिकित्सा परिषद (आयुर्वेद व युनानी) व महाराष्ट्र दंत वैद्य परिषद (डेन्टल) यापैकी संबंधित वैधानिक परिषदेकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.

७) आरोपी व्यक्तींवर खालील कलमांनुसार (लागु असेल ते) गुन्हे नोंदविण्यात यावे.

अ) कलम ३३ म.वै.व्य.अधिनियम १९६१ शासन प्रधिकृत वैद्यक परिषदेकडे नोंदणीकृत नसलेल्या व्यक्तिंनी वैद्यक व्यवसाय करणे.

ब) कलम ३३ (अ) वै.व्य.अधिनियम १९६१ शासन प्रधिकृत वैद्यक परिषदेकडे नोंदणीकृत नसलेल्या व्यक्तिंनी चिकित्सक (फीजीशियन) , शल्यचिकित्सक (सर्जन), डॉक्टर वैद्यक व्यवसायी म्हणुन रुग्णालय, दवाखाना, क्लिनिक चालविणे.

क) कलम ३६ - अधिकृत नसतांना नावापुढे मागे उपाधी,पदवी,पदविका,लावणे.

ड) कलम ३८ - अन्वये सदर गुन्हा दखलपात्र व बेजमानती आहे.

इ) भा.न्या.स.-२०२३ मधील ३१८ (४) फसवणुकीने,अप्रामाणिकतेने लुबाडणुक करणे..

फ) भा.न्या.स.-२०२३ मधील ३१९ (२) तोतयेगिरी करुन फसवणुक करणे

ग) भा.न्या.स.-२०२३ मधील ३१९ (४) तोतयेगिरी करुन फसवणुकीने, अप्रामाणिकतेने लुबाडणुक करणे.- बनावट कागदपत्रादवारे लोकांची फसवणुक करणे.

ह) भा.न्या.स.-२०२३ मधील ३३६ (२) व ३४० - बनावट कागदपत्रे तयार करणे

ज) फसवी जाहिरात करुन फसविणे-औषधे आणि जादुटोणा (आक्षेपार्ह जाहिराती) अधिनियम १९५४

वरील प्रमाणे बोगस डॉक्टरांवर कार्यवाही करिता मार्गदर्शक सुचना (SOP) मान्य करण्यात येत असुन मंजुरी देण्यात येत आहे.

(डॉ.विपिन) भा.प्र.से.

जिल्हा दंडाधिकारी तथा अध्यक्ष

जिल्हास्तरिय पुनर्विलोकन समिती

नागपूर.